पिंपरी चिंचवड महानगरपालिका
क प्रभाग कार्यालय
कार्यपत्रिका क्रमांक-७
सभावृत्तांत

दि.- ३/ १० /२०१३ वेळ- दुपारी ३:०० वाजता

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या क प्रभाग समितीची मासिक सभा क प्रभाग कार्यालयाचे श्री.छत्रपती शिवाजी महाराज सभागृहामध्ये गुरुवार दि. ३/ १० /२०१३ रोजी दुपारी ३.०० वाजता आयोजीत करणेत आली होती सदर सभेस खालीलप्रमाणे मा.नगरसदस्य उपस्थित होते.

1. मा.गव्हाणे सुरेखा शंकर अध्यक्षा
2. मा.आल्हाट मंदा उत्तम
3. मा.आल्हाट धनंजय मुरलीधर
4. मा.काळजे नितीन प्रताप
5. मा.विनया प्रदिप (आबा) तापकीर
6. मा.वाबळे संजय मल्हारराव
7. मा.सौ.गवळी सुनिता (माई) पांडुरंग
8. मा.सुपे आशा रविंद्र
9. मा.चंद्रकांत (भाऊ) साहेबराव वाळके
10. मा.अजित दामोदर गव्हाणे
11. मा.गोफणे अनुराधा देविदास
12. मा.महेशदादा किसन लांडगे
13. मा.श्रध्दा बाजीराव लांडे
14. मा. †›.नितीन ज्ञानेश्वर लांडगे
15. मा.ननवरे जितेंद्र बाबा
16. मा.ओव्हाळ रमा नितीन उर्फ सनी
17. मा.काटे रोहितअप्पा सुदाम
18. मा.गायकवाड संध्या सुरदास
19. मा.काटे राजेंद्र भिकनशेठ
20. मा.मोटे किरण बाळासाहेब
21. मा.सोनकांबळे चंद्रकांता लक्ष्मण
22. मा.संजय केशवराव काटे

तसेच खालीलप्रमाणे अधिकारी/कर्मचारी उपस्थित होते.

मा. फुंदे डि.एम.-प्रभाग अधिकारी, श्री.रविंद्र जाधव-प्र.प्रशासन अधिकारी, मा. संजय खाबडे- कार्यकारी अभियंता विदयुत, मा.बरशेट्टी- कार्यकारी अभियंता (पापू), मा.मकरंद निकम- कार्यकारी अभियंता ड्रेनेज, श्री.इनामदार-लेखाधिकारी, श्री.लगस-सहा.आरोग्याधिकारी, श्री.भोकरे-सहा.आरोग्याधिकारी, श्री.काळे- उपअभियंता, स्थापत्य, श्री.शिंदे- उपअभियंता स्थापत्य, श्री. राजेंद्र शिंदे- उपअभियंता, पाणीपुरवठा, श्री.घुबे-उपअभियंता, पाणीपुरवठा, श्री.बोत्रे- उपअभियंता (स्थापत्य), श्री.जगताप-उपअभियंता स्थापत्य, श्रीमती पाठक- उपअभियंता ड्रेनेज, श्री.पाटील- उपअभियंता, विदयुत, श्री.शशिकांत पाटील-प्राचार्य आयटीआय, श्री.काळे एस.पी. क.अभियंता (ड्रेनेज), श्री.निंबाळकर आर.आर. -क.अभियंता, विदयूत, श्री.नांगरे एस.एस.-क.अभियंता, विदयूत, श्री. दवंडे.- क.अभियंता (पापू), श्री. हेमंत घोड.- क.अभियंता (स्थापत्य), श्री.आढळे-उद्यान निरीक्षक.

मा.अध्यक्षा- सर्व सन्मा.सदस्य व अधिकारी यांचे स्वागत करुन सभेला सुरवात करणेत येत आहे.

-----

<u>उपस्थित सन्मा.सदस्यांचे संमतीप्रमाणे खालील ऐनवेळचे विषय सभा कामकाजात दाखल करुन घेणेत आले.</u>

विषय क्रमांक -३) प्रभाग क्र. ६ मोशी मधील खालील ठिकाणच्या चौकास नाव देऊन नामफलक लावणेबाबत- मा.धनंजय आल्हाट व मा.महेशदादा लांडगे यांचे दि. ३/१०/२०१३ चे पत्र.

विषय क्रमांक -४) दि. ३/१०/२०१३ रोजीच्या क प्रभाग मासिक सभेत ऐनवेळच्या विषयात इंद्रायणीनगर से.नं. १० येथील रहिवासी वसाहतीस इंद्रायणी कॉलनी असे नामकरण करुन नामफलक बसविण्यास मान्यता मिळणेबाबत- मा. संजय वाबळे व मा.नितिन काळजे यांचे दि. ३/१०/२०१३ चे पत्र.

विषय क्रमांक -५) सन २०१३-१४ चे अंदाजपत्रक तरतूद वर्ग करणेबाबत- मा. संजय वाबळे व मा.राजेंद्र काटे यांचे दि. ३/१०/२०१३ चे पत्र.

विषय क्रमांक -६) दापोडी येथील सर्व्हे नं. ८५, येथील भाजी मंडई करीता पिंपरी-चिंचवड आराखडयातील आरक्षित असलेली जागा ताब्यात घेऊन तेथे भाजी मंडई बांधण्याबाबत- मा.रमाताई ओव्हाळ व मा.चंद्रकांता सोनकांबळे यांचे दि. ३/१०/२०१३ चे पत्र.

विषय क्रमांक -७) दापोडी येथील सार्वजनिक स्मशान भूमीमध्ये टॉयलेट व बाथरुम बांधण्याबाबत- मा.रमाताई ओव्हाळ व मा.चंद्रकांता सोनकांबळे यांचे दि. ३/१०/२०१३ चे पत्र.

विषय क्रमांक -८) कासारवाडी (प्रभाग क्र. ६३) येथे उदयानात समूहशिल्प बसवणेबाबत- मा.किरण मोटे व मा. जितेंद्र ननावरे यांचे दि. ३/१०/२०१३ चे पत्र.

विषय क्रमांक -९) गव्हाणे वस्ती येथे जुना संडास ब्लॉक पाडून नवीन संडास ब्लॉक बांधणे या कामास मंजुरी मिळणेबाबत- मा. सुरेखाताई गव्हाणे, मा. शुभांगी लोंढे व मा.श्रध्दा लांडे यांचे दि. ३/१०/२०१३ चे पत्र.

विषय क्रमांक -१०) नविन कॉलनीस नामफलक मिळणेबाबत- मा.मंदाताई आल्हाट यांचे दि. ३/१०/२०१३ चे पत्र.

विषय क्रमांक -११) आरक्षण क्र. ४१३ बहूउद्देशिय हॉल यास शितलबाग हॉल व आरक्षण क्र. ४१४ उदयान या उदयानास धर्मवीर संभाजी उद्यान असे नामकरण करणेबाबत- मा.महेशदादा लांडगे व मा.किरण मोटे यांचे दि. ३/१०/२०१३ चे पत्र.

विषय क्रमांक -१२) प्रभाग क्र. ३१ दिघीमध्ये आरोग्य कार्यालय बांधुन मिळण्याबाबत- मा.आशा सुपे, मा.चंद्रकांता सोनकांबळे व मा.अनुराधा गोफणे यांचे दि. ३/१०/२०१३ चे पत्र.

विषय क्रमांक -१३) सन २०१३-१४ चे अंदाजपत्रक तरतूद वर्ग करणेबाबत.- मा.अनुराधा गोफणे व मा.चंद्रकांता सोनकांबळे यांचे दि. ३/१०/२०१३ चे पत्र.

विषय क्रमांक –१४) वाहतूकीस अडथळा ठरणारी स्वागत कमान काढून टाकणेबाबत- मा.सुनिता गवळी व मा.संजय काटे यांचे दि. ३/१०/२०१३ चे पत्र.

विषय क्रमांक -१५) भोसरी गावठाण प्रभागातील मनपाच्या शाळेच्या प्रांगणात सांस्कृतीक हॉल बांधणेबाबत- मा.नितीन लांडगे व मा. संजय काटे यांचे दि. ३/१०/२०१३ चे पत्र.

-------

अ) दिनांक ७/८/२०१३, (दु,३.०० व ३.२५), दि. ४.९.२०१३ (दु.२.४५) रोजी झालेल्या सभेचा (कार्यपत्रिका क्र.५) सभावृत्तांत कायम करणेत आल्याचे मा.अध्यक्षा यांनी प्रकट केले.

ब) दिनांक ४/९/२०१३ ( दु. ३.०० व ३.१०) रोजी झालेल्या सभेचा (कार्यपत्रिका क्र.६ ) सभावृत्तांत कायम करणेत आल्याचे मा.अध्यक्षा यांनी प्रकट केले.

-----

ठराव क्रमांक - ९५ विषय क्रमांक – १
दिनांक - ३/१०/२०१३ विभाग- स्थापत्य क
सूचक- मा. किरण मोटे अनुमोदक-मा.संजय काटे
संदर्भ- मा.अति.आयुक्त यांचे क्र औ.प्र.सं./४/कावि/२०५/२०१३ दि. २९ / ८ /२०१३ चा प्रस्ताव.

मा.अति.आयुक्त यांची शिफारस विचारात घेवून--

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या कासारवाडी येथील औद्योगिक प्रशिक्षण संस्थाचे "औद्योगिक प्रशिक्षण संस्था (मुलींची) कासारवाडी पुणे ३४ " या ऐवजी "साई शारदा औद्योगिक प्रशिक्षण संस्था (मुलींची) कासारवाडी पुणे ३४ " असे नामकरण करणेस मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----

ठराव क्रमांक - ९६ विषय क्रमांक – २
दिनांक - ३/१०/२०१३ विभाग- विदयुत क
सूचक- मा.संजय काटे अनुमोदक-मा.चंद्रकांता सोनकांबळे
संदर्भ- मा.प्रभाग अधिकारी यांचे जा.क्र.वि/कप्र/८०८/२०१३ दि.२४ /९ /२०१३ चा प्रस्ताव.

मा.प्रभाग अधिकारी यांनी शिफारस केलेप्रमाणे-

मनपा उपविभागातील मनपा इमारतीमधील अग्निशमन यंत्रणेसंबंधीत कामे करणेकामी र.रु. १०,००,०००/- (अक्षरी र.रु. दहा लाख) फक्त चे पुर्वगणनपत्रकास व त्याप्रमाणे काम करण्यास मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

---

<u>सभा कामकाजात दाखल करुन घेणेत आलेले ऐनवेळचे विषय घेणेत आले.</u>

ठराव क्रमांक -९७ विषय क्रमांक – ३
दिनांक - ३/१०/२०१३ विभाग- स्थापत्य क
सूचक- मा.धनंजय आल्हाट अनुमोदक-मा.महेशदादा लांडगे
संदर्भ- मा.धनंजय आल्हाट व मा.महेशदादा लांडगे यांचे दि. ३ /१० /२०१३ चे पत्र.

प्रभाग क्र. ६ मोशी मध्ये स्थानिक नागरीकांच्या वतीने चौकास नाव देणेबाबत व नामफलक लावण्याकरिता जोरदार मागणी होत आहे. संबंधित विषय पुढीलप्रमाणे.

१. प्रभाग क्र. ६ मोशी (लक्ष्मीनगर उत्तर ) येथील चौकास " फुले आंबेडकर चौक " असे नाव देणेस मान्यता देणेत येत आहे. व तसा नामफलक लावण्यात यावा अशी स्थानिक नागरीकांची जोरदार मागणी आहे. संक्षिप्त स्वरुपात नागरीकांची नावे श्री.भऊसाहेब अडागळे, सौ. उषा वाघमारे व इतर
२. प्रभाग क्र. ६ मोशी मधील सेक्टर नं. ४ येथील केंद्रिय विहार समोरील जाणा-या सर्व्हीस रोडवरील चौकास " श्री.स्वामी समर्थ चौक " असे नाव देणेस मान्यता देणेत येत आहे व तसा नामफलक लावण्याकरिता स्थानिक नागरीकांच्या वतीने जोरदार मागणी होत आहे. संक्षिप्त स्वरुपात नागरीकांची नावे श्री.पंकज पवार, श्री.संदेश हडवळे व इतर.

तरी वरील दोन्ही मागण्याचा त्वरीत विचार करुन चौकास नाव देऊन नामफलक लावणेस मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

---

ठराव क्रमांक -९८ विषय क्रमांक – ४
दिनांक - ३/१०/२०१३ विभाग- स्थापत्य क
सूचक- मा. संजय वाबळे अनुमोदक-मा.नितीन काळजे
संदर्भ- मा.संजय वाबळे व मा.नितीन काळजे यांचे दि. ३ /१० /२०१३ चे पत्र.

इंद्रायणीनगर से.नं. १० येथील रहिवासी वसाहतीस " इंद्रायणी कॉलनी " असे नामकरण करुन नामफलक बसविण्यास मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

---

ठराव क्रमांक - ९९ विषय क्रमांक – ५
दिनांक - ३/१०/२०१३ विभाग- स्थापत्य क
सूचक- मा.संजय वाबळे अनुमोदक-मा.राजेंद्र काटे
संदर्भ- मा.संजय वाबळे व मा.राजेंद्र काटे यांचे दि. ३ /१० /२०१३ चे पत्र.

महानगरपालिकेच्या सन २०१३-१४ चे अंदाजपत्रकामधील खाली नमूद केल्याप्रमाणे तरतूद वर्गीकरण करणेस मान्यता देणेकामी सदर ठराव मा.स्थायी समितीकडे पाठविणेत येत आहे.

| अ.क्र | कामाचे नाव | पान क्र. | अ.क्र. | सन २०१३-१४ तरतूद | वाढ करावयाची तरतूद | घट करावयाची तरतूद | एकूण आवश्यक तरतूद |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | वॉर्ड क्र. २४ मध्ये स्टॉर्म वॉटर लाईन टाकणे. | २५० | ६ | १०००००० | २०००००० | ० | ३०००००० |
| २ | वॉर्ड क्र. ९ बो-हाडेवाडी प्राधिकरण सेक्टर क्र,३ व ७ मध्ये फुटपाथ करणे. | २७९ | ३६ | ६००००० | ३००००० | ० | ९००००० |
| ३ | वॉर्ड क्र. २४ इंद्रायणीनगर मधील महाराष्ट्र कॉलनी, चैतन्य पार्क परिसरात स्थापत्य विषयक दुरुस्तीची कामे करणे | ३०५ | १०३ | ५०००० | ८००००० | ० | ८५०००० |
| ४ | वॉर्ड क्र. २४ इंद्रायणीनगर मध्ये मिनीमार्केट परिसरात फुटपाथ करणे व दुरुस्तीची कामे करणे. | २७७ | १२ | १००००० | ४००००० | ० | ५००००० |
| ५ | वॉर्ड क्र. २४ मधील रस्ते डांबरीकरण करणे. | २६७ | ८७ | ७००००० | ० | ३००००० | ४००००० |
| ६ | वॉर्ड क्र. २४ इंद्रायणीनगर मधील समर्थ कॉलनी परिसरात रस्त्यांचे डांबरीकरण करणे. | २६७ | ९५ | १९००००० | ० | १५००००० | ४००००० |
| ७ | वॉर्ड क्र. २४ इंद्रायणीनगर मध्ये महाराष्ट्र कॉलनी व परिसरात फुटपाथ करणे व दुरुस्तीची कामे करणे. | २७७ | १० | २२००००० | ० | १७००००० | ५००००० |
| | एकूण | | | ६५५०००० | ३५००००० | ३५००००० | ६५५०००० |

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

---

ठराव क्रमांक - १०० विषय क्रमांक – ६
दिनांक - ३/१०/२०१३ विभाग- नगररचना व स्थापत्य क
सूचक- मा. रमाताई ओव्हाळ अनुमोदक-मा.चंद्रकांता सोनकांबळे
संदर्भ- मा.रमाताई ओव्हाळ व मा.चंद्रकांता सोनकांबळे यांचे दि. ३ /१० /२०१३ चे पत्र.

पिंपरी चिंचवड महानगरपालिका हद्दीतील गाव, दापोडी, सर्व्हे नं. ८५, भाजी मंडई करीता आरक्षित असलेली जागा ताब्यात घेऊन त्या ठिकाणी भाजी मंडई विकसित करुन नागरिकांना होणारा त्रास टाळण्यात यावा. सध्या असणारी भाजी मंडई रेल्वे फाटकाच्या पलीकडे असल्यामुळे नागरिकांना रेल्वे फाटक ओलांडून पलीकडे भाजीपाल्यासाठी जावे लागते. त्यामुळे रेल्वे रुळ ओलांडत असताना नागरिकांना याठिकाणी अनेक वेळा रेल्वे अपघात होऊन मृत्युला सामोरे जावे लागत आहे.

तसेच पुणे- मुंबई हायवे कडून दापोडी गावामध्ये येण्यासाठी याच भाजी मंडईमधुन रस्ता असल्यामुळे याठिकाणी कार, रिक्षा, मोटारसायकल व सायकल इत्यादी वाहने याच

रस्त्यावरुन येत असल्यामुळे सदरच्या रस्त्यावर वाहनांची गर्दी होऊन वाहतुकीची कोंडी होते व वारंवार अपघात होतात. भाजीपाला खरेदी करायला गेलेल्या नागरिकांना याचा खुप त्रास होत आहे.

तरी सदरची भाजी मंडई करिता आरक्षित असलेली जागा महानगरपालिकेने लवकरात लवकर ताब्यात घेऊन याठिकाणी भाजी मंडई विकसित करण्यास मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

---

ठराव क्रमांक - १०१ विषय क्रमांक – ७

दिनांक - ३/१०/२०१३ विभाग- स्थापत्य क

सूचक- मा. रमाताई ओव्हाळ अनुमोदक-मा.चंद्रकांता सोनकांबळे

संदर्भ- मा.रमाताई ओव्हाळ व मा.चंद्रकांता सोनकांबळे यांचे दि. ३ /१० /२०१३ चे पत्र.

पिंपरी चिंचवड महानगरपालिका हद्दीतील गाव, दापोडी येथील सार्वजनिक स्मशानभुमीमध्ये टॉयलेट व बाथरुम नसल्यामुळे, दशक्रिया व अंत्यविधी करीता येणा-या महिला व पुरुषांकरिता टॉयलेट व बाथरुमची सोय नसल्यामुळे गैरसोय होत आहे.

तरी दापोडी येथील नवीन स्मशान भुमीमध्ये टॉयलेट व बाथरुम बांधुन येथे दशक्रिया व अंत्यविधी करीता येणा-या महिला व पुरुषांची गैरसोय टाळण्यात यावी. सदर ठरावास मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

---

ठराव क्रमांक -१०२ विषय क्रमांक – ८

दिनांक - ३/१०/२०१३ विभाग- स्थापत्य क

सूचक- मा.किरण मोटे अनुमोदक-मा.जितेंद्र ननावरे

संदर्भ-मा.किरण मोटे व मा.जितेंद्र ननावरे यांचे दि. ३ /१० /२०१३ चे पत्र.

कासारवाडी येथील " सितांगण उदयान " येथे उदयान सुशोभीकरण सुरु आहे. या उदयानाच्या सिमाभिंतीवर छत्रपती शाहू महाराज, डॉ.बाबासाहेब आंबेडकर, महात्मा ज्योतिबा फुले, मौलाना अब्दूल कलाम आझाद, पुण्यश्लोक अहिल्याबाई होळकर यांचे म्युरल बसवणेस मान्यता देणेत येत आहे. सदरची प्रक्रिया लवकरात लवकर पुर्ण करावी.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

---

ठराव क्रमांक -१०३ विषय क्रमांक – ९

दिनांक - ३/१०/२०१३ विभाग- स्थापत्य क

सूचक- मा.सुरेखाताई गव्हाणे अनुमोदक-मा.श्रध्दा लांडे

संदर्भ- मा.सुरेखाताई गव्हाणे, मा.शुभांगी लोंढे, मा.श्रध्दा लांडे यांचे दि. ३ /१० /२०१३ चे पत्र.

वॉर्ड क्र. ३४ गव्हाणे वस्ती, समता चौक येथे असलेला संडास ब्लॉक नादुरुस्त व जूना आहे यामुळे तो संडास ब्लॉक पाडून त्या ठिकाणी नवीन संडास ब्लॉक बांधणे जरुरीचे आहे.

महानगरपालिकेच्या सन २०१३-१४ चे अंदाजपत्रकामध्ये पान क्र. ८७८ व अ.क्र.२४ मध्ये तरांगत्या लोकसंख्येसाठी संडास मुता-या बांधणे ( तरतुद रक्कम रुपये ५.०० लाख, अंदाजपत्रकिय रक्कम रुपये १०.०० लाख,, लेखाशिर्ष- संडास व मुता-या प्रभाग) या कामाचा समावेश आहे. या कामाचे तरतुदी मधून गव्हाणे वस्ती येथे जुना संडास ब्लॉक पाडून नवीन संडास ब्लॉक बांधणेचे कामास मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

---

ठराव क्रमांक -१०४ विषय क्रमांक – १०
दिनांक - ३/१०/२०१३ विभाग- स्थापत्य क
सूचक- मा.मंदाताई आल्हाट अनुमोदक-मा.अनुराधा गोफणे
संदर्भ-मा.मंदाताई आल्हाट यांचे दि. ३ /१० /२०१३ चे पत्र.

मोशी प्रभाग क्र. ६ मोशी गावठाण येथील शिवाजीवाडी येथे सर्वे क्र. ५० नविन जकात नाका शेजारी याठिकाणी नविन कॉलनीसाठी नामकरण मिळणेसाठी या कॉलनीचे नाव “ कै.राहुल नगर ” हे नाव देणेस मान्यता देणेत येत आहे. सदर नामफलक शिवाजीवाडी मोशी येथील ठिकाणी लावण्यात यावा.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

---

ठराव क्रमांक - १०५ विषय क्रमांक – ११
दिनांक - ३/१०/२०१३ विभाग- स्थापत्य क
सूचक- मा. महेशदादा लांडगे अनुमोदक-मा.किरण मोटे
संदर्भ-मा.महेशदादा लांडगे व मा.किरण मोटे यांचे दि. ३ /१० /२०१३ चे पत्र.

१) आरक्षण क्र. ४१३ बहूउद्देशिय हॉल यास “ शितलबाग हॉल ” असे नामकरण करणेस मान्यता देणेत येत आहे.
२) आरक्षण क्र. ४१४ उदयान या उदयानास “ धर्मवीर संभाजी उद्यान ” असे नामकरण करणेस मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

---

ठराव क्रमांक -१०६ विषय क्रमांक – १२
दिनांक - ३/१०/२०१३ विभाग- स्थापत्य क
सूचक- मा.आशा सुपे अनुमोदक-मा.अनुराधा गोफणे
संदर्भ-मा.आशा सुपे, मा.चंद्रकांता सोनकांबळे व मा. अनुराधा गोफणे यांचे दि. ३ /१० /२०१३ चे पत्र.

दिघीमध्ये आरोग्य कर्मचा-यांना बसवण्यासाठी व त्यांचे दररोजचे कामकाज करण्यासाठी जागा उपलब्ध नसून सध्या ते दिघीगाव स्मशानभूमीमध्ये कार्यालयीन कामकाज करत आहेत. तसेच सर्व्हे नं. ७९ मध्ये मनपाकडे ३ आर (३ गुंठे) क्षेत्र पिंपरी चिंचवड मनपाच्या ताब्यात आले असून सदर ठिकाणी आरोग्य कार्यालय व आरोग्य कार्यालयासाठी गोडावून आणि महिला कामगारांना कपडे बदलण्यासाठी चेंजिंग रुम बांधणेस तसेच येणा-या खर्चास मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

---

ठराव क्रमांक -१०७ विषय क्रमांक – १३
दिनांक - ३/१०/२०१३ विभाग-स्थापत्य क
सूचक- मा.अनुराधा गोफणे अनुमोदक-मा.चंद्रकांता सोनकांबळे
संदर्भ-मा.अनुराधा गोफणे व मा.चंद्रकांता सोनकांबळे यांचे दि. ३ /१० /२०१३ चे पत्र.

महानगरपालिकेच्या सन २०१३-१४ चे अंदाजपत्रकामध्ये प्रभाग क्र. ३१ (जुना वॉर्ड क्र. १३) येथील कामासाठी खाली नमूद केल्याप्रमाणे तरतूद वर्गीकरण करण्यास मान्यता देणेकामी मा.स्थायी समितीकडे पाठविणेत येत आहे.

| अक्र | कामाचे नाव | लेखाशिर्ष | पान क्र. | सन २०१३-१४ तरतूद | वाढ करावयाची तरतूद | घट करावयाची तरतूद | सुधारित अंदाजपत्रक १३-१४ |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | वॉर्ड क्र.१३ दिघी येथील रस्त्याचे खडीकरण करणे. | खडीमुरुमाचे रस्ते | 254/30 | ११०००० | २५०००० | ० | १३५०००० |
| २ | वॉर्ड क्र. १३ येथे बोर्ड बेंचेस वाचनालय,इ स्थापत्यविषयक कामे करणे | वॉर्ड स्तरीय योजना अंतर्गत कामे | 324/10 | ० | २००००० | ० | २००००० |
| ३ | वॉर्ड क्र १३ दिघी येथिल पवळे रस्ता व इतर ठिकाणी मनपाच्या विकास आराखड्यातील रस्ते विकसीत करणे. | डांबरी रस्ते | 267/94 | २०००००० | ० | ९००००० | ११००००० |
| ४ | वॉर्ड क्र .११ येथील गजानन महाराजनगर, गणेशनगर, कृष्णानगर, येथिल रस्ते डांबरीकरण करणे | डांबरी रस्ते | 265/73 | २३००००० | ० | १४००००० | ९००००० |
| ५ | वॉर्ड क्र. १३ येथील ताब्यात आलेल्या आरक्षणास संरक्षक भिंत उभारणे व इतर कामे करणे. | इमारत योजना | 290/39 | १७५०००० | ४००००० | ० | २१५०००० |
| ६ | वॉर्ड १३ येथे पेव्हिंग ब्लॉक बसविणे व दुरुस्ती करणे | दगडी फरशी व फुटपाथ | 283/88 | ५००००० | ० | २५०००० | २५०००० |
| ७ | वॉर्ड क्र. १३ मनपा इमारतीची रंगसफेदी करणे व इतर दुरुस्ती करणे | स्थापत्य विषयक कामे करणे | 319/48 | ० | १५०००० | ० | १५०००० |
| ८ | वॉर्ड क्र.१३ दिघी येथे ठिकठिकाणी पावसाळी गटर्स करणे. | सरफेस गर्टस | 249/4 | ३००००० | ० | १९५००० | १०५००० |
| ९ | वॉर्ड क्र.१३ दिघी गायकवाड नगर व साईपार्क येथील ताब्यात आलेले डि.पी. रस्ते करणे. | खडीमुरुमाचे रस्ते | 254/29 | ३०००००० | ३००००० | ० | ३३००००० |
| १० | वॉर्ड क्र १३ दिघी येथील श्रीराम कॉलनी, ज्ञानेश्वर पार्क,विजयनगर इ.विविध ठिकाणी बोर्ड,बेंचेस,व पेव्हिंग ब्लॉंक दुरूस्तीची कामे करणे. | वॉर्ड स्तरीय योजना अंतर्गत कामे | 323/9 | ० | १५५००० | ० | १५५००० |

| | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| ११ | वॉर्ड क्र. १३ येथील उर्वरित नाल्याचे बांधकाम करणे. | नाला ट्रेनिंग | 247/19 | ९००००० | ० | ४५०००० | ४५०००० |
| १२ | क प्रभागातील विविध ठिकाणच्या रस्त्यामध्ये सर्व्हीस लाईन टाकल्यानंतर रस्ते दुरुस्त करणे | खडीमुरुमाचे रस्ते | 253/21 | ३००००० | ० | १५०००० | १५०००० |
| १३ | प्र.क्र. ३१ दिघी येथील नाला बांधणे | नाला ट्रेनिंग | 248/37 | १५००००० | ० | १५००००० | ० |
| १४ | वॉर्ड क्र १३ दिघी येथील विविध ठिकाणी रस्त्याच्या ट्रेचेसची दुरूस्ती खडी मुरूम व बीबीएम करणे. | खडीमुरुमाचे रस्ते | 258/77 | ० | ५००००० | ० | ५००००० |
| १५ | वॉर्ड क्र. १३ येथे खडीकरण करणे. ( चरांचे) | खडीमुरुमाचे रस्ते | 258/80 | ० | ५००००० | ० | ५००००० |
| १६ | वॉर्ड क्र १३ दिघी येथे स्थापत्यविषयक दुरूस्तीची कामे करणे. | किरकोळ दुरुस्ती व देखभाल | 307/124 | ० | ५००००० | ० | ५००००० |
| १७ | वॉर्ड क्र. १३ मनपा शाळा दुरुस्ती व वॉटर प्रुफिंग करणे | प्राथमिक व दुय्यम शिक्षण | 873/27 | ० | ५००००० | ० | ५००००० |
| १८ | वॉर्ड क्र. १३ नवीन प्रभाग क्र. ३१ येथे दुरुस्तीची कामे करणे. | स्थापत्य विषयक कामे करणे | 317/20 | ० | १३९०००० | ० | १३९०००० |
| | **एकूण** | | | १३६५०००० | ४८४५००० | ४८४५००० | १३६५०००० |

तरी वरील प्रमाणे मनपाचे सन २०१३-१४ चे अंदाजपत्रकातील एकुण तरतूदीत कोणतीही वाढ न करता रक्कम वर्ग करणेस मान्यता देणेकामी सदर ठराव मा.स्थायी समितीकडे पाठविणेत येत आहे. तसेच सभावृत्तांत कायम होण्याची वाट न पाहता पुढील योग्य ती कार्यवाही व्हावी.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

---

ठराव क्रमांक -१०८ विषय क्रमांक – १४
दिनांक - ३/१०/२०१३ विभाग- स्थापत्य क
सूचक- मा. सुनिता गवळी अनुमोदक-मा.संजय काटे
संदर्भ-मा.सुनिता गवळी व मा.संजय काटे यांचे दि. ३ /१० /२०१३ चे पत्र.

पुणे- नाशिक रोड सदगुरुनगर येथील जुना कचरा डेपोकडे जाणा-या मार्गावर जी स्वागत कमान उभारलेली आहे सदर कमान पुर्णत: चुकीची आहे. हायवेवरुन वाहने सदगुरुनगरकडे वळताना अपघात होण्याची शक्यता नाकारता येत नाही. तरी सदर

धोकादायक कमान त्वरीत काढून टाकणेस मान्यता देणेत येत आहे. नागरीकांच्या जीवास होणारा धोका थांबवावा.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

---

ठराव क्रमांक -१०९ विषय क्रमांक – १५
दिनांक - ३/१०/२०१३ विभाग- स्थापत्य क
सूचक- मा. †>.नितीन लांडगे अनुमोदक-मा.संजय काटे
संदर्भ-मा. †>.नितीन लांडगे व मा.संजय काटे यांचे दि.३/१०/२०१३ चे पत्र.

भोसरी गावठाण (प्रभाग ३५) याठिकाणी मनपाची छत्रपती शिवाजी विदया मंदीर ही शाळा आहे. सदर प्रांगणात मनपाच्या प्राथमिक व माध्यमिक तसेच इंग्रजी माध्यमाची अंदाजे ३००० मुले मुली शिक्षण घेतात परंतु सदर शाळेस सांस्कृतिक हॉल नसल्याने येथे कार्यक्रमांसाठी मिटींगसाठी गैरसोय होते.

त्यामुळे तेथे असलेल्या मोकळया जागेत अंदाजे ( १०० X ५०) ५००० क्षेत्रफळाचा हॉल उभारण्यास मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

---

यानंतर मा.अध्यक्षा यांनी सभा संपल्याचे जाहीर केले.

सही/-
(गव्हाणे सुरेखा शंकर)
अध्यक्षा
क प्रभाग समिती
पिंपरी चिंचवड महानगरपालिका

पिंपरी चिंचवड महानगरपालिका
क प्रभाग कार्यालय भोसरी २६
जा.क्र.कप्रस/कावि/ ४३६ /२०१३
दि. २८/ १० /२०१३

प्र. प्रशासन अधिकारी तथा
सचिव (सभाशाखा)
क प्रभाग समिती
पिंपरी चिंचवड महानगरपालिका

प्रत- सर्व संबंधित शाखाप्रमुख व शाखाधिकारी
यांचेकडे पुढील योग्य त्या कार्यवाहीसाठी रवाना.